**१) पोलीस आयुक्त कार्यालयाकडून जागेचा शांतता व कायदा सुव्यवस्थेबाबतचा अहवाल व वर्तणुक व पुर्व चारिज्य पडताळणी अहवाल पाठविणेबाबत राज्य उत्पादन शुल्क, यांचेकडील पत्र**

प्रति,

मा.पोलीस आयुक्त,
ठाणे शहर

विषय - जागेचा शांतता व कायदा सुव्यवस्थेबाबतचा अहवाल पाठविणेबाबत. तसेच वर्तणुक व पुर्वचारिज्य पडताळणी अहवाल पाठविणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अर्जदार श्री. .............................. (अर्जदाराचे नाव व पत्ता) यांचा मे. ... (आस्थापनेचे नाव व पत्ता)..................... या उपहारगृहास नविन परवाना कक्ष एफएल-३ अनुज्ञप्ती मंजुरीसाठी अर्ज सादर केलेला आहे. तरी प्रस्तावित जागेत परवाना कक्ष अनुज्ञप्ती मंजुर केल्यास सदर परिसरात जातीय व इतर प्रकारच्या दंगली होण्याची शक्यता आहे किंवा कसे याबाबत जागेचा पोलीस अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावित जागेबाबतचा अहवाल पाठविणेस विनंती आहे. तसेच अर्जदार श्री...............................यांचा वर्तणुक व पुर्वचारिज्य पडताळणी अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क

## २) मदयविक्री परवाना अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी

विदेशी मदयविक्री  परवाना (FL III) हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय यांचेकडून देण्यात येतो. त्यामुळे अर्जदार यांचेकडून विदेशी मदयविक्री परवाना (FL III) करीता  राज्य उत्पादन, शुल्क यांचेकडे सादर करण्यात येतो.  तदनंतर राज्य उत्पादन शुल्क यांचेकडून जागा व कायदा व सुव्यवस्था व अर्जदार यांचे पूर्व चारित्र पडताळणी अहवालाकरीता या कार्यालयास कळविण्यात येते.

पोलीस आयुक्त कार्यालयाकडून अर्जदार यांच्या आस्थापनेचे जागेबाबत पडताळणी करुन, कायदा व सुव्यवस्था व पूर्व चारित्र पडताळणी अहवाल व नाहरकत दाखल अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पाठविण्यात येतो.

## ३) मदयविक्री परवाना अर्जासाठी भरावयाची फी व फी भरावयाची पध्दत

पोलीस आयुक्त कार्यालयाकडून नाहरकत दाखला देण्यात येत असल्याने फी आकारण्यात येत नाही.

## ४) मदयविक्री परवाना अर्जाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अर्जदार यांना देण्याचा नाहरकत प्रमाणपत्र

प्रति,

मा.अधीक्षक,

राज्य उत्पादन शुल्क,

विषय - अर्जदार श्री. .....(अर्जदाराचे नाव व पत्ता) यांना ........... (आस्थापनेचे नाव) करीता एफएल- III अनुज्ञप्ती संदर्भात जागेबाबतचा/ वर्तणूक चारिज्य पडताळणी बाबतचा पोलीस अहवाल पाठविणेबाब.

संदर्भ - आपलेकडील पत्र क्र. ................. दिनांक......

----oooo----

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून सस्नेह अग्रेषित, अर्जदार श्री............................. (अर्जदाराचे नाव व पत्ता) यांचा मे. ...... (आस्थापनेचे नाव व पत्ता) ................. या उपहारगृहास नवीन परवाना कक्ष एफएल-३ अनुज्ञप्ती मंजुरीसाठी अर्ज सादर केलेला आहे. तरी प्रस्तावित जागेत परवाना कक्ष अनुज्ञप्ती मंजुर केल्यास सदर परिसरात जातीय व इतर प्रकारच्या दंगली होण्याची शक्यता आहे किंवा कसे याबाबत जागेचा पोलीस अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावित जागेबाबतचा अहवाल पाठविणेबाबत कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी करता, अर्जदार श्री. ....................................यांचे राहते ठिकाणी अभिलेखाची पडताळणी करता त्यांचे विरूध्द .................पो.स्टे. येथे गुन्हे अथवा आक्षेपार्ह नोंदी दाखल नाहीत. मे.................(आस्थापनेचे नाव व पत्ता) करीता प्रस्तावित जागेत परवाना कक्ष अनुज्ञप्ती मंजुर केल्यास शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाही. तरी अर्जदार यांना प्रस्तावित ठिकाणी परवाना कक्ष अनुज्ञप्ती मंजुर करणेस हरकत नाही.

सही/-